# ईशा सरदेसाई यांचे आभार
# तसेच
# गरिमा बोरवणकर यांचे स्वागत

*सिद्धयोग टीचिंग्ज कौंसिल तर्फे पत्र*

आत्मीय वाचकांनो,

आनंदपूर्ण उत्सवांसाठी अनेक शुभेच्छा!

सिद्धयोग मार्गावर, आपण गुरुमाईंकडून असे शिकलो आहोत की, इतर लोकांप्रति आदरभाव व्यक्त करण्याचा एक मुख्य प्रघात असा आहे की त्यांचा ऋणनिर्देश करणे. इतरांचा ऋणनिर्देश करणे आणि आपल्याला वाटलेली कृतज्ञता अभिव्यक्त करणे या गोष्टींचा प्रभाव इतका आहे की, आपल्या परस्परातील दैनंदिन देवाणघेवाणीचे त्या एक स्वाभाविक अंगच बनल्या आहेत. आणि या गोष्टी 'विशेषतः' तेव्हा अतिमहत्त्वाच्या ठरतात, जेव्हा एखादी व्यक्ती असे असाधारण योगदान देते की, जे दूरगामी परिणाम झालेले असतात.

वर्ष २०१८ साठी गुरुमाईंचा संदेश आहे, 'सत्संग'. संदेशासमवेत संलग्नता ठेवण्याने, सिद्धयोग विद्यार्थी तसेच नवीन जिज्ञासू या दोहोंना समान रूपाने जो प्रचंड लाभ झाला आहे, तो एस.वाय.डी.ए. फाउंडेशनच्या या एका युवा स्टाफ मेंबरच्या योगदानामुळेच. तुमचा तिच्याशी चांगल्या प्रकारे परिचय झाला आहे. तिचे नाव आहे ईशा सरदेसाई. ईशा ही त्या सर्व बारा पत्रांची लेखिका होती, जी पत्रे या वर्षी सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवर, त्या-त्या महिन्यांची ओळख दरमहा करून देत होती. आपण जेव्हा या पत्रांविषयी विचार करतो, तेव्हा एक इंग्रजी भाषेतील म्हण 'गुड थिंग्ज कम इन स्मॉल पॅकेजेस्' म्हणजेच 'चांगल्या गोष्टी छोट्याश्याच पार्सलमध्ये येतात,' ही लगेच आठवते. असंख्य लोकांच्या सिद्धयोग साधनेसाठी, यातील प्रत्येक पत्र एक बहुमूल्य मार्गदर्शक बनून राहिले आहे.

प्रत्येक महिन्याला ईशाच्या पत्राखाली प्रकाशित झालेले तुमचे अनुभव वाचणे हे आमच्यासाठी अतिशय आनंददायी राहिले आहे. पत्र वाचनातून तुम्हाला प्राप्त झालेल्या बोधाचे तुम्ही केलेले वर्णन तसेच आत्मनिरीक्षणासाठी या पत्र वाचनामुळे तुम्हाला कशा रीतीने चालना मिळाली याविषयीचा तुम्ही केलेला उल्लेख, या सर्वातून व्यक्त झालेली कृतज्ञतेची भावना मनाला स्पर्श करून जाते. इशाच्या शब्दांच्या आणि ज्ञानाच्या मदतीने तुम्ही तुमच्या साधनेत कसे खोलवर गेला आहात आणि तुमच्या आंतरिक ज्ञानापर्यंत कसे पोहोचू शकला आहात हे पाहून आम्ही प्रभावित झालो आहोत.

आम्ही हेदेखील सांगू इच्छितो की, दरमहा तुमच्यापैकी असंख्य लोकांनी आमच्याशी ईशाच्या पत्रांविषयी संवाद साधणे आणि लिहिणे हे आमच्यासाठी किती हृदयस्पर्शी होते. यामध्ये याचा उल्लेख असायचा की, त्या पत्रांमुळे कशा प्रकारे लोकांना गुरुमाईंचा संदेश 'सत्संग'चा अभ्यास करण्यासाठी आणि संदेश आचरणात आणण्यासाठी प्रेरणा, अंतर्दृष्टी व व्यावहारिक पद्धती यांचा लाभ झाला आहे. तुम्ही सर्वजण या पत्रांमुळे लाभान्वित झाला आहात, याचा आम्हाला अतिशय आनंद वाटतो आहे.

ईशाच्या पत्रांचा अजूनही एक उल्लेखनीय परिणाम म्हणजे त्या पत्रांनी वैश्विक सिद्धयोग संघम्‌ला एकत्र आणले; सिद्धयोग ध्यान केंद्रांमध्ये, संकीर्तन आणि ध्यान मंडळांमध्ये आणि साधना सर्कलस्‌मध्ये सगळ्यांना एकमेकांशी जोडले. आम्ही अनेक सिद्धयोगींकडून ऐकले आहे — श्री मुक्तानंद आश्रमात येणाऱ्या व्हिजीटिंग सेवाकर्त्यांकडून तसेच आमच्या जगभरच्या यात्रेदरम्यान ज्यांच्याशी आमचे बोलणे झाले त्या सिद्धयोगींकडूनही — की सत्संगात सहभागी होण्याचे एक आकर्षण हे असे की, ईशाच्या पत्रांचे वाचन मोठ्याने करणे आणि एकत्र जमून त्यांचा अभ्यास करणे.

ईशाने वर्ष २०१८च्या मासिक पत्रांची लेखिका म्हणून गुरुमाईंना अर्पण केलेल्या या सेवेप्रति आम्ही हृदयपूर्वक कृतज्ञता व्यक्त करू इच्छितो. एस.वाय.डी.ए. फाउंडेशनमधील प्रत्येकाच्या वतीने आणि सिद्धयोग संघम्‌मधील तुम्हा प्रत्येकाच्या वतीने, आम्ही हे सांगण्याची सुसंधी साधू इच्छितो, "धन्यवाद, ईशा!"

या उज्ज्वल संधीकाळी, जेव्हा वर्ष २०१८ आनंदपूर्ण शेवटाकडे येते आहे आणि वर्ष २०१९ आपल्यासमोर प्रकट होण्याच्या काठावर आहे, तेव्हा आम्हाला ही दोन आश्वासने देतांना अतिशय आनंद होतो आहे जी २०१९ने धारण केली आहेत.

- ईशाला सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटसाठी नवीन लेखनाचा कार्यभार प्राप्त होणार आहे.

- आणि, गरिमा बोरवणकर यांनी वर्ष २०१९साठी मासिक पत्रे लिहिण्याच्या जबाबदारीचा इशाकडून कृतज्ञतापूर्वक स्वीकार केला आहे.

गरिमा, गेली ४९ वर्षे सिद्धयोग मार्गाचे अनुसरण करत आहेत आणि त्या एस.वाय.डी.ए. फाउंडेशनच्या स्टाफ सदस्यादेखील आहेत. उत्तर कॅलिफोर्नियामध्ये त्या त्यांचे प्रेमळ पती नितीन व त्यांचा जर्मन शेफर्ड कुत्रा, लिओ [जो त्या दोघांच्या मते, खूपच चलाख आहे] यांच्यासह राहतात.

चला, आपण सर्वजण मिळून पुन्हा एकदा ईशाचे हृदयपूर्वक आभार मानू तसेच पुन्हा एकदा गरिमा यांचेही स्वागत करू या, ज्या मासिक पत्रांची लेखिका या रूपात नवीन सेवेचा कार्यभार स्वीकारत आहेत.

आदरपूर्वक,

*स्वामी अपूर्वानंद*

*स्वामी अखंडानंद*

*स्वामी शांतानंद*

सिद्धयोग टीचिंग्ज कौंसिल

© २०१८ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.